जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर
इमेल.cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र. ९८१९२०८२७९

प्रेसनोट **दिनांक १०.०१.२०२६**

''अवैधरित्या ०२ अग्नीशस्त्रे (पिस्टल) व ०४ जिवंत काडतुसे बाळगणा-या इसमास अटक''

दिनांक ०९/०१/२०२६ रोजी गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे चे पोहवा/धनंजय आहेर यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरुन पथकासह शिळ-डायघर पोलीस ठाणे चे हद्दीतील गोटेघर समोरील पनवेल-मुंब्रा रोडलगत साई गॅरेजजवळ येथे सापळा रचुन आरोपीत नामे सद्दाम मिलन शेख, वय- ३४ वर्षे, रा.शरण निवास बिल्डींग, चौथा माळा, रुम नं. २०३, सम्राटनगर, मुंब्रा, ठाणे यास ०२ देशी बनावटीचे पिस्तुल व ०४ जिवंत काडतुसे सह ताब्यात घेवुन अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी आरोपी विरुध्द शिळ-डायघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं. २५/२०२६ शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३, २५ सह महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम ३७(१), १३५ प्रमाणे दिनांक १०/०१/२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपीत यास दि.१३/०१/२०२६ रोजीपावेतो पोलीस कोठडी मंजुर करण्यात आली आहे. नमुद गुन्हयाचा तपास पोउपनि/प्रकाश शिरसाठ, गुन्हे शाखा घटक-१, ठाणे हे करीत आहेत.

सदर कामगिरी ही श्री. अमरसिंह जाधव,पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री. शेखर बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, शोध-१, गुन्हे शाखा, ठाणे यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.सचिन गायकवाड, पो.उप नि./प्रकाश शिरसाठ, सहा.पो.उप नि. दिपक जाधव, पोहवा/नंदकुमार पाटील, पोहवा/धनंजय आहेर, पोहवा/मुकुंद आव्हाड, मपोहवा/दिपाली जाधव यांनी केली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर